# सरदार पटेल, महर्षी वाल्मिकी, इंदिरा गांधी यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, आद्य महाकवी महर्षी वाल्मिकी यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी यानिमित्त शनिवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सरदार पटेल, महर्षी वाल्मिकी व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे, हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. चव्हाण यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सद्भावनेची शपथ दिली.

# विशेष परीक्षेसाठी नोंदणीचे आवाहन

## सोमवारपर्यंत मुदत; लिंकद्वारे करावी लागणार ऑनलाईन नोंदणी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : कोरोनाचा संसर्ग झाल्याने किंवा तांत्रिक कारणामुळे परीक्षा देऊ शकले नाहीत, तसेच एकाच वेळी दोन परीक्षा असल्याने एका विषयाची परीक्षा देऊ शकले नाहीत. अशा विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी विद्यापीठ देणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या लिंकवर ऑनलाईन नोंदणी करायची आहे. सोमवारी (ता. २) ही नोंदणीची अंतिम तारीख आहे. याबाबतचे परिपत्रक आज विद्यापीठाने प्रसिद्ध केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. काही अपवाद वगळता परीक्षा सुरळीत सुरू आहे, मात्र काही विद्यार्थ्यांना लिंक ओपन न झाल्याने परीक्षा देता आली नाही. काही विद्यार्थ्यांना कोरोनाचा संसर्ग झाला असल्याने ते परीक्षा देऊ शकले नाहीत. अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी विद्यापीठाने अशा विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा घेण्याचे ठरवले आहे. यासाठी विद्यार्थ्यांना लिंक पाठवण्यात येईल. त्यावर नोंदणी करून परीक्षेचा पर्याय द्यायचा आहे. त्यानंतर त्यांची परीक्षा घेतली जाईल.

दरम्यान, आज पहिल्या सत्रात बी. व्होक, एम. एस. डब्ल्यू, अभियांत्रिकी, एम.आर.एस, बी.एस्सी, नॅनो, सायन्स अँड टेक्नॉलजी, लॉ या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

दुसऱ्या सत्रात बी.ए., एम.बी.ए, एम.एस.सी, बी.टेक, एम.बी.ए, बी.कॉम, बी.बी.ए, एम.कॉम, बी.बी.ए, एम.कॉम, एम.ए., बी.फार्म या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. तिसऱ्या सत्रामध्ये बी.एफ.टी.एम., बी.डीईएस, आर्किटेक्चर, बी.जे, बी.लीफ, एम.ए. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. आज एका दिवसात ४४,९५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. तर ६,१९५ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली.

### लिंक ओपन न झाल्याची तक्रार

बी.ए. परीक्षा देणाऱ्या काही विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेची लिंक ओपन झाली नाही. त्यामुळे त्यांना परीक्षा देता आली नाही. त्यांनी या पूर्वीच्या पेपरलाही असाच अनुभव आला होता. त्यांनी याबाबत विद्यापीठाकडे तक्रार दाखल केली आहे.



# 51,153 विद्यार्थ्यांनी दिली अंतिम वर्षाची परीक्षा

## परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना अर्जाचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इतर परीक्षा किंवा कोरोनाची लागण झाली असल्याने परीक्षा न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे. या विद्यार्थ्यांनी दि. २ नोव्हेंबरपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अर्ज करावेत, असे आवाहन परिपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

दरम्यान, शनिवारी ४५ हजार ५७० विद्यार्थ्यांपैकी ४४ हजार ९५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने आणि ऑफलाईन पद्धतीने ६ हजार १९५ असा एकूण ५१ हजार १५३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या.



या परिपत्रकात म्हटले आहे की, शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा मंगळवार, दि. २७ ऑक्टोबरपासून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत. दि. ३१ ऑक्टोबर रोजी पहिल्या सत्रामध्ये बी. व्होक, एम.एस.डब्ल्यू., एम.बी.ए., बी.ई., एम.आर.एस.,

▸▸ पान २ वर

(पान १ वरुन) एम.एस्सी., बी. एस्सी., या अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सत्रात बी.ए, एम.बी.ए., बी. टेक, बी.कॉम, बी.बी.ए., एम.कॉम, एम.ए., बी.फार्म अभ्यासक्रमांच्या आणि तिसऱ्या सत्रामध्ये बी.एफ. टी.एम., बी.टेक्सटाईल्स., बी.जे., बी.लीब., एम.लीब., एम.ए., बी. ईड., एम.ईड., या अभ्यासक्रमांच्या परीक्षा विनाव्यत्यय पार पडल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षाच्या काळात महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित सीईटी व इतर शासकीय परीक्षा होणार असल्यास अथवा परीक्षार्थ्यांस कोविड १९ विषाणूची बाधा झाली असल्यास अथवा समकक्ष विषयामुळे अथवा इतर कारणामुळे एकाचवेळी विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा असल्यास अशा कारणासाठी अनुपस्थित विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. जे विद्यार्थी अंतिम वर्ष अंतिम सत्राची परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांनी विशेष परीक्षेस बसण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# ऑनलाईन ४४ हजार; ऑफलाईनसाठी ६ हजार परीक्षार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षांना सुरुवात झाली आहे. शनिवारी ४५ हजार ५७० विदयार्थ्यांपैकी ४४ हजार ९५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन व ६ हजार १९५ विदयार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने

**शिवाजी विद्यापीठातून...**

परीक्षा दिली. दरम्यान, ऑनलाईन व ऑफलाईनच्या गोंधळामुळे काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही.

ऑनलाईन परीक्षेसाठी यापूर्वी अर्ज दिला होता, परंतु ऑफलाईनमध्ये नाव आले. परीक्षा विभागाशी संपर्क साधल्यानंतर ऑनलाईनमध्ये नाव घालण्यात आले. हॉल तिकीटावर ऑनलाईन परीक्षा देण्याबाबत नमूद करण्यात आले. मात्र, २९ रोजी बाजार आणि किंमत निर्धारण व ३१ रोजी झालेल्या अर्थशास्त्रातील संशोधन पद्धतीने विषयाची ऑनलाईन लिंक न आल्याने परीक्षा देता आली नसल्याचे विद्यार्थिनी शुभांगी पाटील हिने सांगितले. विद्यापीठातील एम.बी.ए. विभागाच्या विद्यार्थिनीस ऑनलाईन व ऑफलाईन घोळामुळे पेपर देता आला नसल्याचे समजते.

# बाधित, गैरहजर विद्यार्थ्यांनी उद्यापर्यंत अर्ज करावेत

**कोल्हापूर :** कोरोना बाधित असल्यामुळे अथवा एकाच दिवशी दोन परीक्षांमुळे अंतिम वर्षाच्या परीक्षांना गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांनी सोमवार (२ नोव्हेंबर) पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे. संकेतस्थळावर अर्ज करुन नोंदणी सूचना विद्यापीठाने शनिवारी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांना २७ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली. विद्यापीठाच्या परीक्षेदिवशी राज्य सामाईक परीक्षा (सीईटी), इतर शासकीय परीक्षा असल्यास अथवा विद्यार्थी कोरोना पॉझिटिव्ह असल्यास अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा परत घेण्याचे आदेश राज्य शासनाने दिले होते. यानुसार अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अर्ज करण्याच्या सूचना केल्या आहेत. सोमवारपर्यंत ऑनलाईन अर्ज करायचे आहेत. दरम्यान, शनिवारी विविध ३४ अभ्यासक्रमांसाठी परीक्षा पार पडल्या. सुमारे ४४ हजार ९५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर ६ हजार १९५ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली.

# शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरळीत पार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील परीक्षा विनाव्यत्यय पार पडल्या. शनिवारी ४५ हजार ५७० विद्यार्थ्यांपैकी ४४ हजार ९५८ जणांनी ऑनलाईन, तर ६ हजार १९५ जणांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने मंगळवार (दि.२७) पासून सुरू झालेल्या या परीक्षा शनिवार (दि. ३१) अखेर विनाव्यत्यय पार पडल्या. शनिवारी सकाळच्या पहिल्या सत्रात बी.व्होक, एम.एस.डब्ल्यू, एम.बी.ए., बी.ई., एम.आर.एस., एम.एस्सी, बी.एस्सी, बी.एस्सी.नॅनो, सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, लॉ या, तर दुसऱ्या सत्रात बी.ए., एम.बी.ए., एम.एस्सी, बी.टेक, बी.कॉम, बी.बी.ए., एम.कॉम, एम.ए, बी.फॉर्म, आणि तिसऱ्या सत्रात बी.एफ.टी.एम., बी.डी.एस, बी. टेक्स्टाईल, एम. आर्च, बी.जे, बी.ए, बी.लिब, एम.लिब, बी. ए. एम.ए, बी.आय.डी., बी.एड, एम.एड, बी.ए.बीएड, बी.एस्सी या अभ्यासक्रमाच्या परीक्षांचा समावेश होता.